## MAHARASHTRA ACT No. XXI OF 1991.

## THE MAHARSHTRA MUNICIPALITIES (TEMPORARY POSTPONEMENT OF ELECTION TO MUNICIPAL COUNCILS) ACT, 1991.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक ३ सप्टेंबर १९९१ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**बी. जी. मोरे,**
प्रधान सचिव व विधि परामर्शी,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXI OF 1991.

## AN ACT TO PROVIDE FOR TEMPORARY POSTPONEMENT OF ELECTIONS TO MUNICIPAL COUNCILS IN THE STATE.

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक ४ सप्टेंबर १९९१ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

## सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१.

**राज्यातील नगरपालिकांच्या निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकण्यासाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

१९६५ चा महा. ४०. **ज्याअर्थी,** महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ याच्या कलम ४० च्या पोट-कलम (१) अन्वये, नगरपालिकेच्या सदस्यांचा पदावधी पाच वर्षे एवढा आहे, व हा पदावधी राज्य शासनाकडून आणखी एक वर्षाच्या कालावधीसाठी वाढविला जाणे शक्य असते;

**आणि ज्याअर्थी,** विवक्षित नगरपालिकांच्या सदस्यांचा वाढीव पदावधी १४ मे १९९१ रोजी समाप्त होणार होता;

**आणि ज्याअर्थी,** भारत सरकारने, महाराष्ट्र शासनाला, त्या वेळी गल्फ प्रदेशात उद्‌भवलेल्या आणीबाणीच्या परिस्थितीमुळे इतर गोष्टींबरोबरच निर्माण होणारी पेट्रोलियम व त्याच्या उप उत्पादनांची संभाव्य टंचाई लक्षात घेऊन राज्यातील स्थानिक संस्थांच्या निवडणुका घेणे लांबणीवर टाकण्याबाबत विनंती केली होती;

**आणि ज्याअर्थी,** दरम्यान, राष्ट्रपतींनी लोकसभा विसर्जित केली होती व लोकसभेच्या मध्यावधी निवडणुका २३ मे व २६ मे १९९१ रोजी घेण्याचे तेव्हा घोषित करण्यात आले होते (या तारखा नंतर बदलण्यात येऊन त्या दिनांक १२ व १५ जून १९९१ अशा करण्यात आल्या); आणि तेव्हा घोषित केलेल्या या निवडणुका एकाच वेळी घेतल्या जाण्याचे टाळणे आवश्यक होते, आणि तसेच जिल्हाधिकारी व त्यांचा संपूर्ण कर्मचारीवर्ग, आणि नगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यासाठी आवश्यक असलेले इतर अधिकारी हे लोकसभा निवडणुकीच्या कामात पूर्णपणे व्यग्र होते;

आणि ज्याअर्थी, त्यानंतर पावसाळ्यास सुरुवात होणार असल्याने उक्त नगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका, पावसाळा संपेपर्यंत घेणे सोयीचे व व्यवहार्य ठरणार नव्हते ;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त कारणांमुळे उक्त नगरपालिकांच्या निवडणुका व पोट-निवडणुका विवक्षित कालावधीसाठी लांबणीवर टाकणे इष्ट होते ;

आणि ज्याअर्थी, अशा प्रकारे निवडणुका लांबणीवर टाकल्यामुळे, उक्त नगरपालिकांचे सदस्य किंवा यथास्थिति, प्रशासक यांचा पदावधी यथोचितरीत्या आणखी वाढविणे आवश्यक होते ;

आणि ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

आणि ज्याअर्थी, निवडणुका लांबणीवर टाकणे व परिणामी पूर्वोक्तानुसार पदावधी वाढविणे यांसाठी, तसेच उक्त बाबींशी संबंधित असलेल्या प्रयोजनांसाठी तरतूद करण्याकरिता कारवाई करणे जीमुळे आवश्यक झाले होते अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली होती आणि म्हणून त्यांनी महाराष्ट्र नगरपालिका (नगरपालिकांच्या निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९९१ प्रख्यापित केला होता ; (१९९१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९.)

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या बेचाळिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, "महाराष्ट्र नगरपालिका (नगरपालिकांच्या निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९९१" असे म्हणावे.

(२) तो दिनांक १० मे १९९१ पासून अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या. २. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "प्रशासक" म्हणजे, नगरपालिका अधिनियमाचे कलम ४८ अ किंवा ३१३ किंवा इतर कोणत्याही तरतुदी याअन्वये, कोणत्याही नगरपालिकेच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व तिची कर्तव्ये पार पाडण्यासाठी नियुक्त करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती ;

(ब) "नगरपालिका" म्हणजे, नगरपालिका अधिनियमान्वये स्थापन केलेली नगरपालिका ;

(क) "नगरपालिका अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ ; (१९६५ चा महाराष्ट्र ४०.)

(ड) या अधिनियमात वापरलेले व यात व्याख्या न केलेले शब्दप्रयोग व संज्ञा यांना कोणत्याही नगरपालिकेच्या संदर्भात, त्यांना नगरपालिका अधिनियमामध्ये नेमून दिलेला अर्थ असेल.

नगरपालिकांच्या निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे आणि पालिका सदस्य व प्रशासक यांचा पदावधी वाढवणे. ३. नगरपालिका अधिनियम अथवा तदन्वये केलेले कोणतेही नियम किंवा उप-विधी यांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी,—

(अ) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून १४ मे १९९२ हा दिनांक धरून त्या दिनांकापर्यंतच्या, किंवा राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अगोदरच्या दिनांकापर्यंतच्या मुदतीमध्ये (या अधिनियमात यापुढे जिचा निर्देश "उक्त मुदत" असा करण्यात आला आहे) नगरपालिकेची कोणतीही निवडणूक आणि कोणत्याही नगरपालिकेतील कोणतेही नैमित्तिक रिक्त पद भरण्यासाठी कोणतीही पोट-निवडणूक घेण्यात येणार नाही;

(ब) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिवशी पदावर असलेल्या, कोणत्याही नगरपालिकेच्या सदस्यांचा (मग ते निवडून आलेले असोत, स्वीकृत केलेले असोत किंवा नामनिर्देशित केलेले असोत) पदावधी किंवा वाढीव पदावधी अथवा कोणत्याही नगरपालिकेच्या प्रशासकाचा पदावधी हा, (मग त्याचा पदावधी उक्त मुदतीपूर्वी समाप्त झालेला असो अथवा उक्त मुदतीमध्ये उक्त दिनांकास किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी समाप्त होणार असो)

आणखी वाढविण्यात आल्याचे किंवा वाढविण्यात आल्याचे किंवा, यथास्थिति, वाढविण्यात येणार असल्याचे मानण्यात येईल; आणि असा प्रत्येक पालिका-सदस्य किंवा प्रशासक हा, उक्त मुदतीमध्ये पद धारण करण्याचे चालू ठेवील :

परंतु, पालिका-सदस्यांचा किंवा प्रशासकांचा या कलमाद्वारे अशा प्रकारे वाढविलेला पदावधी समाप्त झाल्यानंतर ते, पुनर्घटित नगरपालिकेच्या गणपूर्ती असलेल्या पहिल्या बैठकीपर्यंत पदावर राहतील.

**पदावधी वाढविण्यात आलेल्या पालिका-सदस्यांचे व प्रशासकांचे अधिकार आणि विवक्षित कृत्यांचे विधिग्राह्यी-करण.**

४. लगतपूर्वीच्या कलमान्वये ज्यांचा पदावधी अशा प्रकारे वाढविण्यात आल्याचे मानण्यात आले आहे असे नगरपालिकांचे सर्व सदस्य व नगरपालिकांचे सर्व प्रशासक हे, त्यांच्या वाढीव पदावधीमध्ये देखील (मग तो वाढीव पदावधी या अधिनियमाच्या प्रारंभाच्या पूर्वीचा असो या नंतरचा असो), यथास्थिति, असे पालिका-सदस्य किंवा प्रशासक असल्याचे आणि असे पालिका-सदस्य किंवा प्रशासक म्हणून सर्व अधिकारांचा वापर करण्यास आणि सर्व कर्तव्ये व कामे पार पाडण्यास सक्षम असल्याचे मानण्यात येईल; आणि अशा कोणत्याही पालिका-सदस्याने किंवा प्रशासकाने उक्त कालावधीपूर्वी किंवा उक्त कालावधीमध्ये केलेले कोणतेही कृत्य हे, केवळ त्या पालिका-सदस्याचा किंवा प्रशासकाचा पदावधी वेळेवर वाढविण्यात आलेला नव्हता किंवा अन्यथा यथोचित रीत्या वाढविण्यात आलेला नव्हता किंवा, यथास्थिति, वाढविण्यात आलेल्या मुदतीत ती नगरपालिका, पालिका-सदस्य, अध्यक्ष किंवा प्रशासक हे नगरपालिका, पालिका-सदस्य, अध्यक्ष किंवा प्रशासक यांच्या सर्व अधिकारांचा वापर करू शकले नाहीत आणि सर्व कर्तव्ये व कामे पार पाडू शकले नाहीत या कारणावरून विधिअग्राह्य असल्याचे मानण्यात येणार नाही किंवा कोणत्याही न्यायालयात त्या कृत्यास आक्षेप घेता येणार नाही.

**विद्यमान नगरपालिका, पालिका-सदस्य व प्रशासक यांचा वाढीव पदावधी समाप्त झाल्यावर नवीन नगर-पालिका पुनर्घटित करण्याकरिता करावयाची व्यवस्था.**

५. या अधिनियमात काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, राज्य शासनाकडून शासकीय राजपत्रात अधिसूचित केला जाईल अशा (उक्त पदावधी समाप्त होण्यापूर्वीचा असलेल्या) दिनांकानंतर जिल्हाधिकारी व संबंधित इतर अधिकारी हे विद्यमान नगरपालिकांचा, पालिका-सदस्यांचा व प्रशासकांचा या अधिनियमान्वये वाढविण्यात आलेला पदावधी संपण्यापूर्वी किंवा तो संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर, नगरपालिका अधिनियमाच्या व तदन्वये करण्यात आलेल्या नियमांच्या व उप-विधींच्या तरतुदींनुसार नवीन नगर-पालिका घटित करण्याची व्यवस्था करतील.

**सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० लागू होणे.**

६. या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अन्यथा तरतूद करण्यात आली असेल तेवढे खेरीज करून, नगरपालिका अधिनियमाच्या तरतुदी, या, इतर सर्व बाबतीत नगरपालिकांना लागू होतील.

**अडचणी दूर करणे.**

७. अधिनियमाच्या तरतुदी अमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनाला, अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी प्रसंगानुरूप आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट आदेशाद्वारे, करता येईल :

परंतु, असा कोणताही आदेश, हा अधिनियम, शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांका-पासून दोन वर्षांचा कालावधी उलटून गेल्यानंतर काढण्यात येणार नाही.

सन १९९१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ याचे निरसन व व्यावृत्ती.

८. (१) महाराष्ट्र नगरपालिका (नगरपालिकांच्या निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९९१ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९९१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९.

(२) असे निरसन करण्यात आले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा करण्यात आलेली कोणतीही कारवाई ही, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदीद्वारे करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा, यथास्थिति, करण्यात आलेली कोणतीही कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

**प. ग. पाटील,**

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.